विद्यार्थी विकास

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**विद्यार्थी विकास मंडळ**

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

**डॉ. सविता कुलकर्णी**

**संचालक (अतिरिक्त कार्यभार)**

---

संदर्भ क्र. विविमं/२०२५–२६/४४२ दिनांक : २२/१२/२०२५

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील संबंधित शैक्षणिक विभाग, पुणे.

**विषय : भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजुषा–२०२५ मध्ये आपल्या कार्यक्षेत्रातील संस्थांमार्फत अल्पसंख्यांक विभागाच्या लाभार्थ्यांचा सहभाग वाढविण्याबाबत...**

**संदर्भ क्र : ससं/उशि/पुवि/परिपत्रक/२०२५/ई २४७९४९२ दि. १८.१२.२०२५ चे पत्र**

महोदय/महोदया,

मा. जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, मा. उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती आयोग, यांच्या सुचनेनुसार भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा – २०२५ स्पर्धेत अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांनी या प्रश्नमंजुषेमध्ये मोठया प्रमाणात सहभाग नोंदविणेबाबत निर्देश दिले आहे. या अनुषंगाने महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/विभागांना तातडीने खालील सूचना देणेबाबत कळविले आहे.

१. प्रश्नमंजूषेत सहभाग : आपल्या संस्थेशी जोडलेल्या अल्पसंख्यांक विकास विभागाच्या योजनांचा लाभ घेण्याच्या सर्व लाभार्थ्यांनी या उपक्रमामध्ये मोठया प्रमाणात सहभागी व्हावे.

२. निर्देशिका : शासनाकडून प्राप्त झालेली 'संविधान जागृती प्रश्नमंजुषा–२०२५ या उपक्रमाची निर्देशिका (Directive) आणि नोंदणीप्रक्रियेची माहिती संस्थांपर्यंत पोहोचवावी.

महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती आयोग, मुंबई, मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या निर्देशानुसार आपल्या महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/विभागांमध्ये भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा – २०२५ स्पर्धेत अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांनी या प्रश्नमंजुषेमध्ये मोठया प्रमाणात सहभाग नोंदविणेबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी. या संबंधीचे सविस्तर पत्र आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

सद्यस्थितीत महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका–२०२५ च्या अनुषंगाने मा. राज्य निवडणूक आयोगामार्फत आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. आचारसंहितेचा कोणताही भंग होणार नाही याची तसेच सदर कार्यक्रमास कोणत्याही राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार नाहीत याची दक्षता घेऊन सदर उपक्रम राबविण्याबाबतचे निर्देश प्राप्त झाले आहेत. त्यानुसार सदर कार्यक्रमांचे आयोजन करताना आदर्श आचारसंहितेचा कोणताही भंग होणार नाही तसेच याबाबत शासनाच्या प्राप्त निर्देशांचे तंतोतंत पालन होईल याची नोंद घ्यावी.

भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा – २०२५ स्पर्धेत सहभाग घेण्याबाबतची माहिती आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील मुख्य सूचना फलकावर तसेच विद्यार्थी एकत्र येणाऱ्या (उदा. ग्रंथालय/वाचनकक्ष/वर्गखोल्या/विश्रांतीगृह/उपहारगृह/वसतिगृह) अशा दर्शनीय भागात प्रदर्शित करुन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे तसेच सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्याबाबत संबंधितास सूचित करावे.

सदर कार्यक्रमात सहभाग नोंदविणाऱ्या लाभार्थ्यांच्या माहितीसह अहवाल मा. जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी जिल्हाअधिकारी कार्यालय, पुणे. यांच्या dpopune85@gmail.com या ई मेल आयडीवर पाठविण्यात यावा. कळावे हि विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे

(स्वाक्षरी)

(डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार), विद्यार्थी विकास मंडळ

**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग,**
**१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१**
**Web-www.jdhepune.in** **E-mail:jdhepune@gmail.com**
फोननं. ०२०-२६१२७८३३, २६०५१६३२, फॅक्सनं. ०२०-२६१२७८३३

जा.क्र.ससं/उशि/पुवि/ परिपत्रक/२०२५/ई 2479492 दि. १८-१२-२०२५

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, सर्व अकृषि अभिमत व खाजगी विद्यापीठे/संस्था, पुणे विभाग.
३. प्राचार्य /प्राचार्य, अशासकीय अनुदानित/कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, समाजकार्य, व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये, **पुणे,जिल्हा.**

**विषय :भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजूषा-२०२५ मध्ये आपल्या कार्यक्षेत्रातील संस्थांमार्फत अल्पसंख्याक विभागाच्या लाभार्थ्यांचा सहभाग वाढविण्याबाबत.**

संदर्भः १. मा. जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेकडील पत्र क्र. जिनिसपु/नि-९/हि-कि-चा/२५४६/२०२५-२६, दि. १७-१२-२०२५
२.अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. अविवि २०२५/प्र. क्र.१७१/का.९, दिनांक १९ नोव्हेंबर, २०२५.

उपरोक्त संदर्भिय विषयाबाबत मा. जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडील दि. १७-१२-२०२५ च्या पत्रान्वये भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजूषा-२०२५ मध्ये आपल्या कार्यक्षेत्रातील संस्थांमार्फत अल्पसंख्याक विभागाच्या लाभार्थ्यांचा सहभाग वाढविण्याबाबत कळविलेले आहे.

भारतीय संविधानाला ७५वर्ष पूर्ण झाल्याच्या अनुषंगाने राज्यात संविधान अमृत महोत्सवी जनजागृती अभियानांतर्गत संविधान जागृती प्रश्नमंजूषा-२०२५" हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. २ मधील महाराष्ट्र शासनाच्या पत्रानुसार, मा. उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग यांनी केलेल्या सूचनेनुसार, अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांनी या प्रश्नमंजुषेमध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवावा, यासाठी निर्देश देण्यात आले आहेत.

या अनुषंगाने, आपल्या कार्यक्षेत्रातील विद्यापीठे व महाविद्यालये यांना तातडीने सूचना द्याव्यात.

**या सूचनांमध्ये खालील बाबींचा समावेश असावा:**

- **प्रश्नमंजूषेत सहभाग:** आपल्या संस्थेशी जोडलेल्या अल्पसंख्याक विकास विभागाच्या योजनांचा लाभ घेणाऱ्या सर्व लाभार्थ्यांनी या उपक्रमामध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे.
- **निर्देशिका:** शासनाकडून प्राप्त झालेली 'संविधान जागृती प्रश्नमंजुषा-2025' या उपक्रमाची निर्देशिका (Directive) आणि नोंदणीप्रक्रियेची माहिती संस्थांपर्यंत पोहोचवावी.

सदर कार्यक्रमात सहभाग नोंदविणाऱ्या लाभार्थ्यांच्या माहितीसह अहवाल मा. जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे. यांच्या dpopune८५@gmail.com या ई मेल आयडीवर सादर करावा, सोबत संदर्भीय पत्राची पत्र संलग्न करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत पुणे जिल्हयातील महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुका-२०२५ च्या अनुषंगाने मा. राज्य निवडणूक आयोगामार्फत आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. आचारसंहितेचा कोणताही भंग होणार नाही याची तसेच सदर कार्यक्रमास कोणत्याही राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार नाहीत याची दक्षता घेऊन सदर उपक्रम राबविण्यात यावा, असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

त्याअनुषंगाने विभागातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजूषा-२०२५ मध्ये आपल्या कार्यक्षेत्रातील संस्थांमार्फत अल्पसंख्याक विभागाच्या लाभार्थ्यांचा सहभाग वाढविण्याबाबत उपक्रम राबविण्यात यावा, तसेच सदर कार्यक्रमाचे आयोजन करताना आदर्श आचारसंहितेचा कोणताही भंग होणार नाही, सहपत्रान्वये प्राप्त निर्देशांचे तंतोतंत पालन होईल याची नोंद घ्यावी.

**सोबत :** संदर्भिय पत्र व सहपत्रे.

Digitally signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 19-12-2025
12:29:22

**(डॉ. अशोक उबाळे)**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

**प्रत :** मा. जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

महाराष्ट्र शासन
जिल्हा नियोजन समिती,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

ई-मेल : dpopune85@gmail.com दूरध्वनी : (020) 26121012

क्र. जिनिसपु/नि-९/हिं-कि-चा/ २५४६/२०२५-२६ दिनांक: १७/१२/२०२५

प्रति,

१. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे
२. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद (प्राथमिक/माध्यमिक), पुणे
३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक), पुणे महानगरपालिका, पुणे
४. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक), पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी चिंचवड.

**विषय: भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजूषा-२०२५ मध्ये आपल्या कार्यक्षेत्रातील संस्थांमार्फत अल्पसंख्याक विभागाच्या लाभार्थ्यांचा सहभाग वाढविण्याबाबत.**

**संदर्भ:** अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. अविवि २०२५/प्र.क्र.१७१/का.९, दिनांक १९ नोव्हेंबर, २०२५.

भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या अनुषंगाने राज्यात 'संविधान अमृत महोत्सवी जनजागृती अभियानांतर्गत' **"संविधान जागृती प्रश्नमंजूषा-२०२५"** हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. १ मधील महाराष्ट्र शासनाच्या पत्रानुसार, मा. उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग यांनी केलेल्या सूचनेनुसार , अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांनी या प्रश्नमंजुषेमध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवावा, यासाठी निर्देश देण्यात आले आहेत.

- या अनुषंगाने, आपल्या कार्यक्षेत्रातील विविध प्रशिक्षण संस्था, अधिक्षक वसतीगृहे, तंत्रनिकेतन (Polytechnics), अल्पसंख्याक शाळा, मदरसे यांना तातडीने सूचना द्याव्यात.

**या सूचनांमध्ये खालील बाबींचा समावेश असावा:**

- **प्रश्नमंजूषेत सहभाग:** आपल्या संस्थेशी जोडलेल्या अल्पसंख्याक विकास विभागाच्या योजनांचा लाभ घेणाऱ्या सर्व लाभार्थ्यांनी या उपक्रमामध्ये **मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे.**
- **निर्देशिका:** शासनाकडून प्राप्त झालेली 'संविधान जागृती प्रश्नमंजुषा-२०२५' या उपक्रमाची निर्देशिका (Directive) आणि नोंदणीप्रक्रियेची माहिती संस्थांपर्यंत पोहोचवावी.

सदर कार्यक्रमात सहभाग नोंदविणाऱ्या लाभार्थ्यांच्या माहितीसह अहवाल या कार्यालयास सादर करावा, जेणेकरून सदर अहवाल शासनास सादर करणे या कार्यालयास सोयीचे होईल. सोबत संदर्भीय पत्राची पत्र संलग्न करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत पुणे जिल्ह्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका—2025 च्या अनुषंगाने मा. राज्य निवडणूक आयोगामार्फत आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. आचारसंहितेचा

कोणताही भंग होणार नाही याची तसेच सदर कार्यक्रमास कोणत्याही राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार नाहीत याची दक्षता घेऊन सदर उपक्रम राबविण्यात यावा.

सोबत वरील प्रमाणे

(किरण इंदलकर)
जिल्हा नियोजन अधिकारी तथा
जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

mcul
21/11/25

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
दालन क्र. ५२८, मंत्रालय (विस्तार इमारत),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.

✆ 022-22830626
✉ desk9.mdd-mh@gov.in

---

क्रमांक: अविवि २०२५/ प्र.क्र.१७१/का.९ दिनांक: १९ नोव्हेंबर, २०२५

प्रति,

सर्व जिल्हा नियोजन अधिकारी तथा
जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी,
जिल्हा अल्पसंख्याक कक्ष,
जिल्हाधिकारी कार्यालय.

विषय:- भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजूषा-२०२५
संदर्भ:-१) मा.ॲड.धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६.९.२०२५ रोजी झालेली सुनावणी व दिनांक १२.११.२०२५ रोजी झालेली बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या अनुषंगाने राज्यात संविधान अमृत महोत्सवी जनजागृती अभियानांतर्गत संविधान जागृती प्रश्नमंजूषा-२०२५ हा उपक्रम राबविण्यात येत आहे. संविधान जागृती प्रश्नमंजुषा-२०२५ या उपक्रमाच्या निमित्ताने, मा. उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग यांनी दिनांक १२.११.२०२५ रोजी झालेल्य बैठकीमध्ये अल्पसंख्याक विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांनी संविधान जागृती प्रश्नमंजुषा-२०२५ मध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवावा यासाठी विभागस्तरावरुन संबंधीतांना निर्देश द्यावेत अशा सूचना केलेल्या आहेत.

२. संविधान जागृती प्रश्नमंजुषा-२०२५ हा उपक्रमाची निर्देशिका सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. तसेच यानुषंगाने नोंदणीप्रक्रीया, राबविण्यात येणाऱे उपक्रम यांची माहिती मोनाल थुल, युवा करिअर यांचे दिनांक २६.८.२०२५ च्या पत्रामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. सबब, सदर पत्र व मा. उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १२.११.२०२५ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. तरी, आपल्या जिल्ह्यातील अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांनी या उपक्रमामध्ये मोठ्या

प्रमाणात सहभागी व्हावे, यासाठी विविध प्रशिक्षण संस्था, अधिक्षक वसतीगृहे, तंत्रनिकेतन, अल्पसंख्याक शाळा, मदरसे इ. यांना आपल्या स्तरावरुन तातडीने सूचना द्याव्यात. व सहभाग नोंदविणाऱ्या लाभार्थ्यांच्या माहितीसह अहवाल शासनास सादर करावा, ही विनंती.

आपला,

सोबत-वरीलप्रमाणे.

(प्र. दा. अंधारे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-माहितीस्तव
उपाध्यक्ष तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालये.

जिल्हा नियोजन समिती, पुणे
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे.
आवक क्र: 6303
दिनांक 21 NOV 2025
संकलन 10
प. अ. जि.नि.अ.

युवा करियर

प्रति,

मा. उपाध्यक्ष तथा सदस्य,
महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती व जमाती आयोग,
म. रा., मुंबई

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोग, वरळी, मुंबई ४०० ०१८
आवक क्र. 4856 दिनांक : 26.8.25
कार्यालय अधीक्षक

विषय :- भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा - 2025 : युवा करिअर द्वारे निर्देशिका.

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणांस विनंती अर्ज सादर करतो की, बोधी वृक्ष शिक्षण संस्था, नागपूर व्दारा संचालित युवा करियर क्लबव्दारा युवकांचा भविष्याच्या दृष्टीकोनातून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असतात. आम्ही समाजातील युवकांमध्ये संविधाना विषयी जनजागृती करण्यासाठी भारतीय संविधान जागृती मंजुषा-२०२५ हा कार्यक्रम राबविणार आहोत. ज्याव्दारे युवकांमध्ये संविधाना विषयी जागृती निर्माण होईल. आम्ही राबविणाऱ्या कार्यक्रमाची रुपरेषा खालीलप्रमाणे असणार आहे.

1. परिचय :

भारतीय संविधान, जे 26 जानेवारी 1950 रोजी स्वीकारले गेले, हे जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचे अधिष्ठान आहे, ज्यामध्ये न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचे मूल्य अंतर्भूत आहेत. युवा करिअरने भारतीय संविधान क्विझ स्पर्धा 2025 ची सुरुवात केली आहे, ज्यामुळे युवकांमध्ये संविधानाचे महत्त्व समजावे आणि नागरिक ज्ञानास प्रोत्साहन मिळावे. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये संविधानाच्या तत्त्वांविषयी सखोल आदर निर्माण करणे, त्यांना स्वस्थ स्पर्धेत सहभागी करून घेणे आणि त्यांच्या अधिकार, कर्तव्य व जबाबदाऱ्यांविषयी जागरूकता वाढवणे हा आहे.

2. उद्दिष्टे :

युवा करिअर तर्फे आयोजित भारतीय संविधान क्विझचे उद्दिष्ट :
विद्यार्थ्यांची भारतीय संविधानाच्या इतिहास व संरचनेची समज वाढवणे. नागरिकांचे अधिकार व कर्तव्ये तसेच भारतीय लोकशाहीची कार्यपद्धती याविषयी जागरूकता निर्माण करणे. विद्यार्थ्यांना भारताच्या घटनात्मक इतिहासाची व प्रमुख नेत्यांच्या योगदानाची कदर करण्यास प्रेरित करणे. विद्यार्थ्यांना राज्य पातळीवर असे व्यासपीठ उपलब्ध करून देणे जिथे ते आपले नागरिक ज्ञान व शासनाची समज प्रदर्शित करू शकतील.

3. प्रमुख फोकस क्षेत्रे :

प्रस्तावना : न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता यांसारख्या मूल्यांची जाण. मूलभूत अधिकार व कर्तव्ये : संविधानात नमूद केलेल्या अधिकार व कर्तव्यांचा सखोल अभ्यास. धोरण मार्गदर्शक तत्त्वे : शासनात यांची भूमिका व महत्त्व. शासन रचना : कार्यकारी, विधायिका आणि न्यायपालिका यांची भूमिका व कार्ये. मुख्य दुरुस्ती व ऐतिहासिक खटले : सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वाचे निर्णय आणि संविधानातील प्रमुख दुरुस्ती. संविधान निर्माता : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आणि इतर प्रमुख व्यक्तींचे योगदान.

4. भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा - 2025 रचना :

**नोंदणी** : महाराष्ट्रातील शाळा व महाविद्यालये आपले विद्यार्थी युवा करिअरच्या ऑनलाइन व्यासपीठाद्वारे नोंदवू शकतात. प्रारंभिक फेरी : संविधान, शासन व नागरिक कर्तव्यांविषयी विद्यार्थ्यांचे ज्ञान तपासणारी ऑनलाइन परीक्षा. जिल्हा व राज्य स्तर : प्रारंभिक फेरीतील निवड विद्यार्थी पुढील स्तरावर सहभागी होतील. राज्यस्तर : राज्यस्तरीय विजेते राज्य स्तरावर स्पर्धा करतील.

Phone. 9422038808
Email. yuvacareerclub2015@gmail.com
Address. Shatabdi Sq. Manewada Ring Rode, Nagpur.

युवा करियर

DATE:

5. भाषा व सुलभता :
स्पर्धेत व्यापक सहभाग सुनिश्चित करण्यासाठी, भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा - 2025 मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांमध्ये आयोजित केली जाईल. यामुळे विविध भाषिक पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांना समान संधी मिळेल.

6. बक्षिसे व मान्यता :
**सर्वोत्तम शाळा :** राज्य स्तरावर तीन शाळांना ट्रॉफी, प्रमाणपत्र व रोख पारितोषिके. व्यक्तिगत पुरस्कार : उत्कृष्ट विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, प्रमाणपत्रे व विशेष मान्यता. सहभाग प्रमाणपत्र : सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात येतील.

7. आयोजन संस्था :
युवा करिअर, जी संस्था युवक विकास व करिअर मार्गदर्शन यावर लक्ष केंद्रित करते, ती संविधानाविषयी जागरूकता निर्माण करण्यास व विद्यार्थ्यांमध्ये नागरिक जबाबदारी प्रोत्साहित करण्यास कटिबद्ध आहे.

**नोंदणी प्रक्रिया :**
1. **आंतरिक निवड :** शाळा व महाविद्यालये स्वतःची पहिली निवड फेरी आयोजित करतील. निवडलेले विद्यार्थी प्रारंभिक फेरीसाठी नोंदणी करतील.
2. **पात्रता :** प्रारंभिक फेरीसाठी नोंदणी सर्व शाळा व महाविद्यालयांना खुली आहे.
3. **नोंदणी अट :** शाळा व महाविद्यालयांना किमान 10 विद्यार्थ्यांची नोंदणी करणे बंधनकारक आहे. त्यापेक्षा जास्त विद्यार्थ्यांची नोंदणी करता येईल.
4. **नोंदणी शुल्क :** प्रत्येक विद्यार्थ्यासाठी ₹99 शुल्क लागू होईल. नोंदणीवेळी शाळा / महाविद्यालय हे शुल्क भरतील.
5. **नोंदणी लिंक :** शाळा व महाविद्यालये [युवा करिअर क्लब] www.yuvacareer.com या संकेतस्थळावर जाऊन नोंदणी करू शकतात. नोंदणी व शुल्क भरण्याची प्रक्रिया "भारतीय संविधान क्विझ स्पर्धा"पृष्ठावर उपलब्ध असेल.

तरी वरील कार्यक्रम राबविण्यास आपणांस विनंती करतो, की संबंधीतास त्याबाबत आदेश निर्गमीत करण्यात यावे, ही विनंती.

धन्यवाद !

आपला विश्वासू,

(मोनाल थुल),

Phone. 9422038808
Email. yuvacareerclub2015@gmail.com
Address. Shatabdi Sq. Manewada Ring Rode, Nagpur.

सत्यमेव जयते


# महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग

प्रशासकीय इमारत, पहिला मजला, पूर्व विभाग, डेअरी विभाग,
अब्दुलगफार खान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई-४०० ०१८.
दूरध्वनी क्र.(कार्यालय): २४९४३८१९/०२
*E-mailadd:-scstcomm@yahoo.com*


जा.क्र.मराअजाआ/मुं/सामाजिक व आर्थिक विभाग/प्र.क्र. ५४१-२०२५/ ४८०७ दि: १८/११/२०२५

प्रति,

१) मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा. सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५) मा. सचिव, इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
६) मा. सचिव, अल्पसंख्यांक विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७) मा. सचिव, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८) मा. आयुक्त, आदिवासी विकास विभाग, राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक.
९) मा. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) मा. कुलगुरू, महाराष्ट्र विधी विद्यापीठ, नागपूर.
११) मा. महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) मा. संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संसथा (TRTI), महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय : भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा - २०२५ : युवा करिअरद्वारे निर्देशिका.**

अर्जदार श्री. मोनाल अ. थुल यांच्या वरील विषयाच्या अनुषंगाने आयोगाचे मा.ॲड. धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, वरळी, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दि. १२.११.२०२५ रोजी आयोगाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडले आहे. इतिवृत्तामध्ये दिलेल्या निर्देशानुसार अहवाल आयोगास सादर करावा, ही विनंती.

मा.ॲड. धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग, वरळी, मुंबई यांच्या आदेशानुसार कळविण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती/जमाती आयोग मुंबई

(रमेश वळवी)
पोलीस निरीक्षक,
महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग,
वरळी, मुंबई.

प्रत : श्री. मोनाल अ. थुल, युवा करिअर, बोधीवृक्ष शिक्षण संस्था, नागपूर

# महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग

प्रशासकीय इमारत, पहिला मजला, पूर्व विभाग, डेअरी विभाग,
अब्दुल गफार खान मार्ग, वरळी सी फेरा, मुंबई - ४०० ०१८
दूरध्वनी क्रं. (कार्यालय) ०२२-२४९४३८१९,


**महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे मा. ॲड. धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य यांचे अध्यक्षतेखाली दि. १२/११/२०२५ रोजी आयोगाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीचे इतिवृत्त खालीलप्रमाणे,**

<u>(सामाजिक व आर्थिक विभाग) प्रकरण क्रमांक - ५४१/२०२५</u>

**विषय :- संविधान जागृती प्रश्न मंजुषा - २०२५**

दि. १२/११/२०२५ रोजी आयोजित बैठकीमध्ये सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई व आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांचे वतीने श्रीमती स्वाती इथापे, उपायुक्त (ना.ह.सं), समाज कल्याण, पुणे, सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई याचे वतीने श्री. प्र. दा. अंधारे, कक्ष अधिकारी, आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांचे वतीने श्री. अनिल महाजन, सहाय्यक प्रकल्प अधिकारी, सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे वतीने श्री. अनिरुध्द कुलकर्णी, अवर सचिव, सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे वतीने श्री. श्रीनाथ हेंद्रे, कक्ष अधिकारी. सचिव, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय मुंबई यांचे वतीने श्री. पोवार, प्रतिनिधी, महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे वतीने श्री. सुमेध थोरात, प्रकल्प व्यवस्थापक उपस्थित होते. कुलगुरू, महाराष्ट्र नॅशनल लॉ विद्यापीठ, नागपूर यांच्या वतीने प्राध्यापक (डॉ.) व्ही.पी. तिवारी, कायदा विभाग प्रमुख उपस्थित होते.

श्री. अनिल महाजन, सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण), आदिवासी विकास विभाग, नाशिक यांनी नमूद केले की, आयुक्तालयाचे पत्र क्रं. शिक्षण-२०२५/प्र.क्र./का-६(४) ७७९२, दि. ८/१०/२०२५ अन्वये संविधान जागृती प्रश्न मंजुषा-२०२५ राबविण्या संबंधी आयुक्तालयाने प्रकल्प अधिकारी व मुख्याध्यापक यांना निर्देश दिलेले आहेत. त्यामध्ये संविधान जागृती प्रश्न मंजुषा-२०२५ राबविण्यासाठी येणारा खर्च कार्यालयाला प्राप्त होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावे. प्रत्येक शाळेतून किमान १० विद्यार्थी पेक्षा अधीक विद्यार्थी भाग घेतील अशा पध्दतीने नियोजन करावे, असे निर्देश देण्यात आलेले आहेत, असे सांगितले.

यावर आयोगाने नमूद केले की, आयुक्त, आदिवासी विकास विभाग, म. रा., नाशिक यांनी या विषयाच्या संदर्भाने सकारात्मक प्रतिसाद देत त्यांनी त्या पध्दतीचे आदेश काढलेले असून कार्यवाही सुरू केलली आहे. संकेतस्थळ प्राप्त होताच त्यांना सगळ्या अनुदानित व शासकीय आश्रमशाळामधील निवडक विद्यार्थ्यांना संविधान जागृती प्रश्न मंजुषा-२०२५ या महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाच्या पुढाकारातून सुरू केलेल्या उपक्रमातून विभागाने मान्यता दिलेली आहे व तशा पध्दतीची कार्यवाही सुरू केलेली आहे. तसेच इतर खर्चातून आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांनी सर्व अनुदानित शाळेच्या मुख्याध्यापक यांनी प्राप्त तरतूदीतून या खर्चाची व्यवस्था करुन देण्यात आली आहे. प्रत्येक शाळेतून किमान १० किंवा त्यापेक्षा अधिक विद्यार्थी भाग घेतील, अशा पध्दतीची विभागाची तयारी झालेली आहे. याच प्रकारे सर्व विभागाने देखील कार्यवाही करावी असे आयोगाने निर्देश दिले.

श्रीमती स्वाती इथापे, उपायुक्त (ना.ह.सं), समाज कल्याण विभाग, म. रा., पुणे यांनी नमूद केले की, शासकीय निवासी शाळा-९२, शासकीय वसतिगृहे-४४९ आहेत. त्यातील इच्छूक विद्यार्थ्यांची निवड करणे व त्यांना संविधान जागृती प्रश्न मंजुषा-२०२५ या उपक्रमामध्ये त्यांचा सहभाग नोंदविणे यासाठी आपल्या स्तरावर विभाग कार्यवाही करत आहे. याबाबतच्या खर्चाची तरतूद सामाजिक न्याय विभागाने या सर्व शाळांच्या व वसतिगृह मुख्याध्यापकांना व वसतिगृह प्रमुखांना तात्कालीक कार्यासाठी ज्या राशीची तरतूद करण्यात आलेली आहे, त्या राशीतून या उपक्रमासाठीचा खर्च करण्यात येईल. तशा पध्दतीने कार्यवाही करुन याबाबत माहिती देणेबाबत मुख्याध्यापकांना वसतिगृह प्रमुखांना सूचना दिल्या आहेत.

श्री. अनिरुध्द कुलकर्णी, अवर सचिव यांनी नमूद केले की, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने याबाबत दि. २५.०२.२०२४ ला पत्र काढले आहे. तसेच भारत सरकारचे शालेय शिक्षा व साक्षरता विभाग यांचे दि. ०३.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये दि. २६.११.२०२४ ते २६.११.२०२५ या एक वर्षाच्या कालावधीमध्ये संविधान दिवस साजरा करण्याबाबतच्या उपक्रमांचे वेळापत्रक दिले आहे. तसेच संबंधितांकडून अभिप्राय / कंसेंट घ्यावयाचे आहेत. शालेश शिक्षण विभागाकडे महाराष्ट्र राज्यामधील शासकीय शाळा ६५,०६४ असून एकूण ५१,६७,१२७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. साधारणता अनुदानित, शासकीय व विनाअनुदानित शाळा १,०८,००० असून त्यामध्ये शिक्षण घेण्याऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २,१२,००,००० आहे. महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई यांनी भारतीय संविधान - २०२५ हा उपक्रम राबविण्यासंबंधी निर्देशित केल्याप्रमाणे हा कार्यक्रम सशुल्क असल्याने आम्हाला नियमानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेकडील गाभा समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्या विभागाची नियमानुसार परवानगी घेणे आवश्यक आहे.

त्यावर आयोगाने निर्देशित केले की, शालेय शिक्षण विभागाने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेकडील गाभा समितीच्या आवश्यक त्या अभिप्राय / परवानग्या प्राप्त करुन या कार्यक्रमामध्ये सक्रीय सहभाग नोंदविण्याची कार्यवाही तत्काळ प्रभावाने करुन पुढील कार्यालयीन कामकाजाच्या ३ दिवसामध्ये आयोगास माहिती द्यावी, असे निर्देशित केले.

श्री. श्रीनाथ हेंद्रे, कक्ष अधिकारी, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी नमूद केले आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत ९८० निवासी आश्रमशाळा आहेत. त्यामध्ये साधारणतः सव्वा दोन लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विभागांतर्गत आश्रमशाळांमध्ये संविधान जागृती प्रश्नमंजुषा-२०२५ हा उपक्रम राबविणेबाबत या विभागाच्या दि. ११.११.२०२५ रोजीच्या परिपत्रक निर्गमित केले आहे. तसेच प्रत्येक शाळेला वेतनेत्तर अनुदान देण्यात येत असून त्यातून हा खर्च भागवावा, असे निर्देश संबंधित शाळांना दिलेले आहेत.

श्री. प्रशांत अंधारे, कक्ष अधिकारी, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी नमूद केले की, अल्पसंख्यांक विकास विभागाकडून विविध कल्याणकारी योजना येतात त्याप्रमाणे सदरचा उपक्रम राबविण्यात राबविणेबाबत विभागामार्फत सूचना देत आहोत. तसेच सदर आयोगाच्या बैठकीचे पत्र दि. ११.११.२०२५ रोजी मिळाले आहेत. तसेच या उपक्रमाबाबत रुपरेषा तयार करुन या उपक्रमात वसतीगृह व इतर योजनांच्या लाभार्थ्यांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदविण्याबाबत सूचना केली जाईल.

...३..
कृ.मा.प.

त्यावर आयोगाने असे निर्देशित केले की, अल्पसंख्याक विभागाच्या अधिनस्त असणाऱ्या वसतीगृह, शाळा मधील विद्यार्थ्यांची संख्या व विविध योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या याची माहिती आयोगास सादर करावी. तसेच अल्पसंख्याक विभागाने तीन कार्यालयनी कामकाजाच्या दिवसामध्ये त्यांच्या अधिनस्त असलेल्या कार्यरत संस्था, शाळा व विविध उपक्रमांच्या माध्यमांतून लाभार्थ्यांची संख्या याची माहिती आयोगास उपलब्ध करुन द्यावी. तसेच संविधान जागृती प्रश्नमंजुषा-२०२५ या उपक्रमाच्या निमित्ताने काय कार्यवाही केली. याबाबतचे सर्वकष पत्र आयोगास सादर करावे, असे निर्देशित करण्यात येत आहे.

सदर बैठकीस महाराष्ट्र नॅशनल लॉ विद्यापीठ, नागपूर यांच्या वतीने प्राध्यापक (डॉ.) व्ही. पी. तिवारी, कायदा विभाग प्रमुख, डॉ. दिविता कोठेकर, सहाय्यक प्राध्यापक आणि डॉ. आरती तायडे, सहाय्यक प्राध्यापक उपस्थित होते. संविधान जागृती प्रश्न मंजुषा-२०२५ या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या पाठ्यक्रमाची सविस्तर माहिती बैठकीत देण्यात आली. मराठी, इंग्रजी आणि हिंदी या तीन भाषांमध्ये १५ दिवसांचे ऑनलाइन प्रशिक्षण आयोजित केले जाणार असल्याचे सांगण्यात आले. प्रश्न मंजुषेसाठीचे प्रश्नसंच हा तयार केलेल्या पाठ्यक्रमावर आणि प्रशिक्षणा दरम्यान शिकवलेल्या विषयांवर आधारीत असेल, असेही स्पष्ट करण्यात आले. तसेच या उपक्रमात सहभाग आणि सहकार्य करण्याबाबत सूचित करण्यात आले.

कुलगुरु, कुलसचिव, महाराष्ट्र नॅशनल लॉ विद्यापीठ, नागपूर यांनी सदर विषयातील तज्ञ प्राध्यापकासह बैठकीला उपस्थित विविध विभागातील सर्व जेष्ठ अधिकाऱ्यांच्या समन्वयाने व विविध विभागाचा अभिप्राय घेऊन पाठयक्रम व प्रश्नावली तयार करावी. त्याकरिता बार्टी, पुणे यांनी दुरदृष्य प्रणालीव्दारे बैठकीचे आयोजन करावे. बैठक आयोजित करण्यासाठी वरील संस्थेची मदत घ्यावी. त्यासंबंधी माहिती आयोगाकडे सादर करावी.

संविधान जागृती प्रश्न मंजुषा-२०२५ हा उपक्रम दि. २६ नोव्हेंबर, २०२५ ते दि. २६ नोव्हेंबर, २०२६ पर्यंत महाराष्ट्र शासनाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागाने वेगवेगळया पध्दतीने कालबध्द कार्यक्रम राबवून विद्यार्थ्यांना संविधानाची माहिती व संपूर्ण ज्ञान प्राप्त होईल याची दक्षता घ्यावी, असे निर्देशित करण्यात आले.

सदर उपक्रमाच्या उद्‌घाटनासाठी मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. ना. श्री. एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व मा. ना. श्री. अजीतदादा पवार, उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. ना. श्री. संजय शिरसाट, मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय् विभाग, महाराष्ट्र राज्य व श्रीमती माधुरी मिसाळ, राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय् विभाग, महाराष्ट्र राज्य यांना महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाच्या वतीने निमंत्रण देऊन त्यांची वेळ आरक्षीत करण्याची कार्यवाही आयोगाचे सदस्य सचिव यांनी करावी, असे निर्देशित करण्यात आले. संबंधीत सर्व विभागाने या संपूर्ण उपक्रमाची कालबध्द पध्दतीने अंमलबजावणी करीत त्याचा अनुपालन अहवाल वेळोवेळी आयोगाकडे सादर करण्याबाबत निर्देशित करण्यात आले.

(ॲड. धर्मपाल मेश्राम)
उपाध्यक्ष तथा सदस्य,
महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग,
म. रा., मुंबई

मंत्रालयीन सेवा
महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
दालन क्र. ५२८, मंत्रालय (विस्तार इमारत),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.

✆ 022- 22830626
✉ desk9.mdd-mh@gov.in

पुण्यश्लोक 300

---

क्रमांक: अविवि २०२५/ प्र.क्र.१७१/का.९ दिनांक: १९ नोव्हेंबर, २०२५

प्रति,

सर्व जिल्हा नियोजन अधिकारी तथा
जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी,
जिल्हा अल्पसंख्याक कक्ष,
जिल्हाधिकारी कार्यालय.

विषय:- भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजूषा-२०२५

संदर्भ:-१) मा.ॲड.धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६.९.२०२५ रोजी झालेली सुनावणी व दिनांक १२.११.२०२५ रोजी झालेली बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या अनुषंगाने राज्यात संविधान अमृत महोत्सवी जनजागृती अभियानांतर्गत संविधान जागृती प्रश्नमंजूषा-२०२५ हा उपक्रम राबविण्यात येत आहे. संविधान जागृती प्रश्नमंजुषा-२०२५ या उपक्रमाच्या निमित्ताने, मा. उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग यांनी दिनांक १२.११.२०२५ रोजी झालेल्य बैठकीमध्ये अल्पसंख्याक विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांनी संविधान जागृती प्रश्नमंजुषा-२०२५ मध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवावा यासाठी विभागस्तरावरुन संबंधीतांना निर्देश द्यावेत अशा सूचना केलेल्या आहेत.

२. संविधान जागृती प्रश्नमंजुषा-२०२५ हा उपक्रमाची निर्देशिका सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. तसेच यानुषंगाने नोंदणीप्रक्रीया, राबविण्यात येणारे उपक्रम यांची माहिती मोनाल थुल, युवा करिअर यांचे दिनांक २६.८.२०२५ च्या पत्रामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. सबब, सदर पत्र व मा. उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १२.११.२०२५ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. तरी, आपल्या जिल्ह्यातील अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांनी या उपक्रमामध्ये मोठ्या

प्रमाणात सहभागी व्हावे, यासाठी विविध प्रशिक्षण संस्था, अधिक्षक वसतीगृहे, तंत्रनिकेतन, अल्पसंख्याक शाळा, मदरसे इ. यांना आपल्या स्तरावरुन तातडीने सूचना द्याव्यात. व सहभाग नोंदविणाऱ्या लाभार्थ्यांच्या माहितीसह अहवाल शासनास सादर करावा, ही विनंती.

आपला,

सोबत-वरीलप्रमाणे.

(प्र. दा. अंधारे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-माहितीस्तव

उपाध्यक्ष तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालये.

जिल्हा नियोजन समिती, पुणे
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे.
आवक क्र. 198
दिनांक 19 NOV 2025
संकलन नि-10
स. जि.अ.
जि.नि.अ

मंत्रालयीन सेवा

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्यांक विकास विभाग
दालन क्र. ५२८, मंत्रालय (विस्तार इमारत), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२

दूरध्वनी क्र. ०२२ २२८३ ०६२६
मेल आयडी- desk१.mdd-mh@gov.in
संकेतस्थळ : mdd.maharashtra.gov.in

क्र. अविवि २०२५/प्र.क्र.१७१/का.९ दि.१२ डिसेंबर, २०२५

प्रति,

**आयुक्त,**
अल्पसंख्याक आयुक्तालय,
छत्रपती संभाजीनगर.

**विषय:-** **भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजूषा-२०२५**

**संदर्भ:-** १. उपाध्यक्ष तथा सदस्य,महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६.९.२०२५ रोजी झालेली सुनावणी व दिनांक १२.११.२०२५ रोजी झालेली बैठकीचे इतिवृत्त.

२. उपाध्यक्ष तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग यांच्या अध्यक्षतेखाली दि.१२.२.२०२५ रोजीच्या बैठकीमध्ये देण्यात आलेल्या सूचना

महोदया,

भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या अनुषंगाने राज्यात संविधान अमृत महोत्सवी जागृती अभियानांतर्गत भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजूषा-२०२५ हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यासंदर्भातील सविस्तर सूचना शासनस्तरावरुन देण्यात आल्या आहेत. सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मा. उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२.१२.२०२५ रोजी सामाजिक न्याय भवन, नागपूर येथे बैठक पार पडली आहे.

२. भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजूषा-२०२५ मध्ये विध्यर्थ्यांचा सहभाग नोंदविण्यासाठी **www.yuvacareer.com** ही वेबसाईट सुरु करण्यात आली आहे. सदर वेबसाईटवर अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांनी (विविध प्रशिक्षण संस्था, अधीक्षक वसतीगृहे, तंत्रनिकेतन, अल्पसंख्याक शाळा, मदरसे, इत्यादी) सहभाग नोंदवावयाचा आहे. सदर पोर्टलवर दि.१०.१२.२०२५ पासून नोंदणी सुरु असून दि.३१.१२.२०२५ पर्यंत विध्याथ्यांना नोंदणी करता येणार आहे. सदर वेबसाईटवर किती विध्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे याबाबतची माहिती विभागाच्या संकेतस्थळावर अपलोड करावयाची असून महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगास देखील सादर करावयाची आहे.

Scanned with OKEN Scanner

३. प्रस्तुत प्रकरणी अल्पसंख्याक विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची अंमलबजावणी करण्याकरिता निवड करण्यात आलेल्या विविध प्रशिक्षण संस्था, अधीक्षक वसतीगृहे, तंत्रनिकेतन, अल्पसंख्याक शाळा व महाविद्यालये, मदरसे, इत्यादी यांमधील विध्यार्थी/लाभार्थी यांना भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजूषा-२०२५ मध्ये सहभागी करण्यासाठी www.yuvacareer.com या वेबसाईटवर विध्यार्थ्यांकडून दि.३१.१२.२०२५ पर्यंत नोंदणी करण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या सूचनाजिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी यांना आपल्यास्तरावरुन देण्यात याव्यात. प्रस्तुत प्रकरणी उक्त वेबसाईटवर नोंदणी झालेल्या विध्यार्थी/लाभार्थ्यांचा अहवाल शासनास सादर करावा, ही विनंती.

आपला,

( सारंगकुमार पाटील )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) सर्व जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी, जिल्हा अल्पसंख्याक कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, यांना प्रस्तुत प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने अग्रेषित.

२) निवडनस्ती का-१.

Scanned with OKEN Scanner